CMYK

एकाच दिवशी संपलं संपूर्ण कुटुंब! पोटच्या मुलाने आई-वडिलांना कुऱ्हाडीने ठार करुन स्वत:लाही दिला मृत्यूचा घाव >> पान 2

एम्समधील नॅट केंद्राचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ >> पान 3

भुमराळा गावात बिबट्याचा धुमाकूळ! >> पान 4

**सुविचार**
नेहमी शांत आणि संयमी राहा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 94 ■ शुक्रवार, दि. 07 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




होता जीवा म्हणून वाचला शिवा... रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी'मध्ये सलमान खान साकारणार 'जिवा महाला' आतील पान

# लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी मुदत वाढणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीआधी जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मात्र यात बोगस लाभार्थी घुसल्यानंतर या योजनेवर निर्बंध आणण्यात आले असून लाभार्थींना ईकेवायसी बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र दोन महिने उलटले तरी अद्याप अर्ध्याही लाभार्थी महिलांचे ईकेवायसी पूर्ण झालेले नाही. तांत्रिक अडचणींमुळे २.४० कोटी महिलांपैकी केवळ ८० लाख महिलांचेच ईकेवायसी पूर्ण झाले आहे, त्यामुळे विभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

महिला व बालविकास विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या लाडकी बहीण योजनेत सध्या दोन कोटी ४० लाख महिला लाभ घेत आहेत. १८ सप्टेंबर महिन्यापासून या महिलांचे ईकेवायसी करण्यास सुरुवात झाली. मात्र कधी ओटीपी येण्यात अडचण तर कधी आधार संलग्नतेतील अडचणींमुळे महिलांना ईकेवायसीत अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याबाबत प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ८० लाख महिलांचे ईकेवायसी पूर्ण झाले आहे. १८ नोव्हेंबरआधी ईकेवायसी पूर्ण करण्याचे आव्हान असून त्यासाठी जनजागृती करण्यावर भर देण्यात येत आहे. पुढील आठवड्यापर्यंत जास्तीत जास्त महिलांचे ईकेवायसी पूर्ण करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

**पती, वडील हयात नसलेल्या महिलांचीही समस्या सोडवणार**

विधवा तसेच घटस्फोटीत महिलांना ईकेवायसी करण्यात मोठी अडचण येत आहे. पती तसेच वडीलही हयात नसल्याने त्यांना ईकेवायसी करण्यात येत नसल्याच्या तक्रारी विभागाकडे येत आहेत. या महिलांची समस्या सोडविण्यासाठीही प्रयत्न सुरू असून लवकरच त्यावर तोडगा निघणार असल्याचे मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या.

**६ लाख लाभार्थ्यांचे पैसे थांबवले**

लाडकी बहीणच्या >> पान २

## मुदत वाढविण्याबाबत तत्कालीन परिस्थीती पाहून निर्णय - अदिती तटकरे



ही योजना अधिक पारदर्शक करण्यासाठी १८ सप्टेंबरपासून ईकेवायसी करण्यात येत आहे. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी सर्व्हरची क्षमता वाढवून प्रतिदिन ५ लाख ऐवजी प्रतिदिन १० लाख करण्यात आली आहे. दूर झालेल्या तांत्रिक अडचणी व सर्व्हरची वाढलेली क्षमता पाहता १८ नोव्हेंबरपर्यंत सर्व लाभार्थ्यांचे ईकेवायसी पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र, काही प्रमाणात लाभार्थ्यांची ईकेवायसी राहिल्यास तत्कालीन परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

## मनोज जरांगेंच्या जीवाला धोका, पोलिसांनी दोघांना उचलले



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे आणि सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रस्थानी असलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याबाबत एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. त्यांना जीवे मारण्याचा कट रचल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी जालना पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं आहे. मराठा आंदोलक जरांगे यांना अशाप्रकारे जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे पाटील यांच्या जीवाला धोका असल्याची तक्रार बीड जिल्ह्यातील त्यांच्या काही समर्थकांनी जालना पोलीस ठाण्यात केली होती. जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट दोन व्यक्ती रचत असल्याचा संशय या तक्रारीत व्यक्त करण्यात आला होता. या तक्रारीची तातडीने दखल घेत जालना गुन्हे शोध पथकाने वेगाने तपासचक्र फिरवली. तपास पथकाने गुप्त माहितीच्या आधारे जरांगेंना जीवे मारण्याचा कट रचण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतलं आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या दोघांची नावे अद्याप कळू शकलेली नाहीत. पोलिसांनी अत्यंत गोपनीयता पाळत ही कारवाई केली आहे. या दोन्ही संशयितांना सध्या अज्ञात ठिकाणी ठेवण्यात आले असून, जालना पोलिसांकडून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

मराठा आंदोलनाचे नेतृत्व करत असलेल्या जरांगे पाटील यांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याच्या शक्यतेने मराठा समाज आणि त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. पोलिसांनी या कटामागील सूत्रधार आणि त्यांचा नेमका उद्देश काय होता, याचा सखोल तपास सुरू केला आहे. या चौकशीतून लवकरच मोठे गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे.




# पार्थ पवार जमीन खरेदी प्रकरणात मुख्यमंत्री ॲक्शन मोडवर, चौकशी समिती स्थापन



**मुंबई/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील ४० एकरांचा भूखंड विकत घेतल्यानंतर राजकीय आरोपांची राळ उठली. विरोधकांनी आरोप केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात योग्य ती चौकशी करून कारवाई करू, असे सांगितले होते. यानंतर आता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समितीही स्थापन करण्यात आली आहे.**



शिवसेनेचे (ठाकरे) नेते अंबादास दानवे यांनी एका वृत्तवाहिनीच्या बातमीनंतर पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमीन खरेदी व्यवहार प्रकरणात अजित पवार आणि त्यांचे चिरंजीव पार्थ पवार यांना लक्ष्य केले. पुण्यातील कोरेगाव पार्क येथील महार वतनाची १८०० कोटी रुपयांच्या किमतीची जमीन पार्थ पवार यांनी ३०० कोटी रुपयांमध्ये खरेदी केल्याचा आरोप त्यांनी केला.

विरोधकांच्या आरोपांनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून योग्य ती चौकशी करून कारवाई करू, असे म्हटले होते. त्यानंतर आता एका तहसीलदाराचे निलंबन केले असल्याची माहिती मिळत आहे. मात्र जमीन खरेदी व्यवहार आणि हे निलंबन याचा संबंध काय आहे? याबाबत अद्याप स्पष्टता दिलेली नाही. तसेच अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. माध्यमांनी दिलेल्या बातमीनुसार, या प्रकरणात आणखी काही अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

''सदर प्रकरणासंदर्भात मी सर्व माहिती मागवली आहे. महसूल विभाग, आयजीआर, लँड रेकॉर्ड्स याची सर्व माहिती मागितली आहे. योग्य ते चौकशीचे आदेशही मी दिलेले आहेत. प्राथमिकदृष्ट्या जे मुद्दे समोर येत आहेत. ते गंभीर आहेत. >> पान २

## पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी तहसीलदारांचे तात्काळ निलंबन, मुख्यमंत्र्यांचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यातील जैन बोर्डिंग आर्थिक व्यवहारानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीलाही पुण्यातील १८०० कोटींची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये विकल्याची माहिती समोर आली आहे. या जमीन व्यवहारात गैरप्रकार झाले असून केवळ ५०० रुपयांच्या स्टँपड्युटीवर हा व्यवहार झाल्याचं प्रथमदर्शनी दिसून येत आहे. विरोधकांनी याप्रकरणी रान उठवल्यानंतर आता सरकारने कारवाईला सुरुवात केली असून पुण्यातील संबंधित जागा प्रकरणी तहसिलदारांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे आदेश दिल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

पार्थ पवारांना १८०० कोटींची जमीन ३०० कोटी रुपयांत विकल्याचे प्रकरण उजेडात आले, विशेष म्हणजे या व्यवहारात स्टँप ड्युटीही ५०० फक्त आकारण्यात आल्याचे दिसून आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, व्यवहारात अनियमितता झाली असेल तर ते चुकीचं आहे. कुठेही अनियमितता झाली असेल तर कारवाई झालीच पाहिजे, या मताचे आम्ही आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते. >> पान २

# थंडीची चाहूल!

## पुढील २४ तासांत मुंबईसह राज्यभरात तापमान कमी होणार



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या १५ ते २० दिवसांपासून परतीचा पाऊस आणि त्यानंतर अवकाळी पावसाने हजेरी लावली. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसाला पोषक वातावरण तयार झालं होतं. अजूनही काहींमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असली तरी आता तापमानामध्ये घट होण्यास सुरुवात होणार असल्याचं प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलय. गेल्या काही आठवड्यांपासून अधून मधून सुरू असलेल्या पावसानंतर अखेर मुंबईसह, विदर्भ मराठवाड्यात थंडीची चाहूल लागणार आहे. भारतीय व हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ६ ते ७ नोव्हेंबरपासून मुंबई आणि उपनगरांमध्ये तापमान ४ ते ५ अंशांनी घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामानात स्पष्ट बदल जाणवेल. मात्र पुढील २४ तासात मध्य महाराष्ट्र दक्षिण कोकण व गोवा भागात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हवामान विभागाचा अंदाज काय?

भारतीय हवामान केंद्राने जारी केलेल्या हवामान अंदाजानुसार, पुढील दोन दिवसात किमान तापमान दोन ते >> पान २

# संजय रायमुलकर पडले नाहीत, त्यांना पाडलं गेलं!

## मंत्री गुलाबराव पाटील यांचे स्फोटक वक्तव्य

### शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिरात भावनिक भाषण; 'आपल्याच लोकांवर' सूचक टीका

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा** :बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे झालेल्या शिवसंकल्प प्रशिक्षण शिबिरात राज्याचे जलसंपदा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलेल्या विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. कार्यक्रमात बोलताना पाटील म्हणाले. संजय रायमुलकर पडले नाहीत त्यांना पाडलं गेलं आणि तेही आपल्याच लोकांकडून!''

या एका वाक्याने सभागृहात क्षणभर शांतता पसरली, आणि त्यानंतर टाळ्यांचा कडकडाट झाला. पाटील यांचे हे विधान सध्या जिल्ह्यातील राजकारणात चर्चेचा मुख्य विषय ठरले आहे.

या वाक्यातून पाटील यांनी जिल्ह्यातील शिवसेनेतील गटबाजी आणि अंतर्गत मतभेदांवर सूचक बोट ठेवलं, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. रायमुलकर यांचा पराभव हा विरोधकांनी नव्हे तर ''घरातील हातांनी'' झाला, असा संदेश पाटील यांच्या वाक्यातून व्यक्त झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.



> राजकारणात पराभव हा नेहमी विरोधकांनी घडवलेला नसतो; कधी कधी आपलेच जवळचे हातही त्याला कारणीभूत ठरतात. पाटील यांच्या या विधानानंतर शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गटातील स्थानिक नेते काय प्रतिक्रिया देतात, याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे.
> हे वक्तव्य भावनिक होते की रणनीतीचा भाग यावरही तर्कवितर्क सुरू आहेत.

**गुलाबरावांची बेधडक शैली**

पाटील यांच्या भाषणात नेहमीप्रमाणे विनोद आणि टोचणं दोन्ही होतं. बाई कशीही असो, कपाळावर कुंकू असलं की शोभून दिसतं माणूस कसाही असो नकटा, चपटा, पण आपला तो आपलाच असतो,'' असं म्हणत त्यांनी उपस्थितांमध्ये हशा पिकवला. आपल्या प्रवासाबद्दल बोलताना ते म्हणाले मी बारावी पास आहे, कॉलेज शिकू शकलो नाही. पण बाळासाहेब ठाकरे यांनी मला विधानसभेचं तिकीट दिलं. कायदा बनवणाऱ्या मंडळात पाठवलं आणि आज मी मंत्री आहे.''



सरकार दोन गोष्टींवर चालतं जीआर आणि सीआर. और हम जीआर भी निकालते हैं और तुम्हारा सीआर भी निकालते हैं! ही ताकद आहे लोकप्रतिनिधीची.''

''रायमुलकर पाडले गेले'' या विधानातून राजकीय सत्तासंघर्ष आणि स्थानिक समीकरणे उघड झाली आहेत. काहींच्या मते, पाटील यांनी आपल्या भाषणातून 'घरातील भिंतींवरची भेग' अधोरेखित केली, तर काहींच्या मते, हे वक्तव्य कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याचा भावनिक प्रयत्न होता.

गुलाबराव पाटील हे स्पष्टवक्ते नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या शब्दांमध्ये बेधडकपणा असला तरी, क्षणी त्या मागे नेहमी कार्यकर्त्यांबद्दलचं प्रेम आणि वास्तवदर्शन असतं. ''रायमुलकर पाडले गेले'' हे वाक्य त्यांच्या त्या प्रामाणिकतेचं उदाहरण ठरतं. ते फक्त राजकीय विधान नाही, तर प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांना देणारा संदेश आहे घरातील मतभेद मिटवा, नाहीतर घरचं घर खाईल.''

**देविदास खनपटे**
**मुख्य संपादक**

CMYK

>> पान २

# एकाच दिवशी संपलं संपूर्ण कुटुंब! पोटच्या मुलाने आई-वडिलांना कुऱ्हाडीने ठार करुन स्वत:लाही दिला मृत्यूचा घाव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात आज सकाळी हृदयद्रावक घटना घडली आहे. सावरगाव डुकरे (ता. चिखली) या शांत गावात मुलाने आपल्या आई-वडिलांची कुऱ्हाडीने हत्या करून स्वतःचाही जीव संपवल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मृतांमध्ये विशाल सुभाष डुकरे (वय ४२), त्यांचे वडील सुभाष डुकरे (वय ७५) आणि आई लता डुकरे (वय ६५) यांचा समावेश आहे. गुरुवारी सकाळी विशालने कुऱ्हाडीने आई-वडिलांवर वार करत त्यांचा घटनास्थळीच मृत्यू केला आणि त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली.





घटनेची माहिती मिळताच बुलढाणा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक निलेश तांबे, चिखली पोलीस ठाण्याचे अधिकारी व फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. घराला सील करण्यात आले असून पंचनामा सुरू आहे. तिन्ही मृतदेहांना पोस्टमार्टमसाठी चिखली उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

या दुर्दैवी घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून शेजारी आणि नातेवाईकांकडून माहिती घेतली जात असून, पोस्टमार्टम अहवालानंतरच हत्येमागील खरा कारण समोर येईल, अशी शक्यता आहे.

या घटनेने सावरगाव डुकरे गावावर शोककळा पसरली आहे. एकाच घरातील तीन मृत्यूंनी गावात हळहळ आणि भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच रायगड जिल्ह्यातही असाच प्रकार घडला होता. म्हसळा तालुक्यातील मेंदडी गावात दोन मुलांनी आपल्या वृद्ध आई-वडिलांची हत्या केली होती. घरखर्च आणि कौटुंबिक वादातून झालेल्या या दुहेरी हत्येमुळे रायगड जिल्हाही हादरला होता.

दोन्ही घटनांमुळे राज्यभरात प्रश्न निर्माण झाला आहे काय एवढं तुटलंय नात्यांमध्ये, की पोरं स्वतःच्या जन्मदात्यांवरच घाव घालू लागली आहेत?

## रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा मोठा फटका; लोकलने चार प्रवाशांना उडवले!

**मुंबई/प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळं गुरूवारी (६ नोव्हेंबर) मुंबईतील लोकल रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळं लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशातच लोकल सेवा विस्कळीत झाल्यामुळं काही प्रवासी रेल्वे रुळावरूनच चालत जात होते. यादम्यान, पाठीमागून आलेल्या लोकलनं चार प्रवाशांना उडवले. यात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली.

रेल्वे कर्मचाऱ्यांचे आंदोलन का? : ९ जून रोजी मुंब्रा इथं दोन लोकल ट्रेनचा अपघात झाला होता. त्यावेळी पाच जणांचा मृत्यू झाला होता. या अपघाताच्या तपासाचा अहवाल आता लोहमार्ग पोलिसांनी सादर केला आहे. या अहवालात घटनेच्या चार दिवस आधी, रेल्वे कर्मचाऱ्यांनी ट्रॅकचा एक तुकडा बदलला परंतु तो वेल्डिंग न करता सोडला, ज्यामुळं हा अपघात झाल्याचं म्हटलं आहे. म्हणजेच रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळं हा अपघात झाल्याचा ठपका लोहमार्ग पोलिसांनी ठेवला आहे.

## मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावर दोन नवीन रेल्वे स्टेशन सुरु होणार; एक स्टेशन डायरेक्ट नवी मुंबई विमानतळाला कनेक्ट होणार

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : नवी मुंबईत राहणाऱ्या लाखो प्रवाशांची मोठी अडचण दूर होणार आहे. मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावर दोन नवीन रेल्वे स्टेशन सुरु होणार आहेत. मध्य रेल्वेच्या बेलापूर-उरण रेल्वे मार्गावर ही स्थानके असणार आहेत. नवीन रेल्वे स्थानकांसह रेल्वे प्रशासनाने या मार्गावरील लोकल ट्रेनची संख्या वाढवण्याचाही निर्णय घेतला आहे.

हार्बर मार्गवर नेरुळ उरण अशी रेल्वे सुरु आहे. आता बेलापूर-उरण मार्गावर दोन नवीन स्थानके उभारली जाणार आहेत. तरघर आणि गव्हाण ही दोन स्थानके सुरू करण्यात येणार आहेत. नवी मुंबई विमानतळापर्यंत जाण्यासाठी बेलापूर आणि बामणडोंगरी रेल्वे स्थानकांचा पर्याय आहे. नव्याने खुले होणारे तरघर हे विमानतळाच्या सर्वाधिक जवळचे स्थानक आहे. या नव्या रेल्वे स्थानकामुळे नवी मुंबई विमानतळाला डायरेक्ट कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

तारघर रेल्वे स्टेशन नवी मुंबई विमानतळाजवळ आहे, त्यामुळे याचा प्रवाशांना आणि विमानतळ कर्मचाऱ्यांना फायदा होईल. सीवूड बेलापूर-उरण मार्गावरील लोकल ट्रेनच्या फेऱ्यांची संख्या मध्य रेल्वेच्या मेन, हार्बर आणि ट्रान्स-हार्बर मार्गापेक्षा खूपच कमी आहे. उरण मार्गावरील प्रवाशांची संख्या वाढत असूनही, लोकल ट्रेनची संख्या वाढवलेली नाही. आता या मार्गावरील लोक फेऱ्यांची संख्या वाढवली जाणार आहे.

उरण मार्गावर दीड तासांच्या अंतराने लोकल ट्रेन उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रवाशांकडून लोकल ट्रेनची संख्या वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. सीवूड-बेलापूर-उरण मार्गावर पाच अप आणि पाच डाउन लोकल धावणार आहेत. तरघर आणि घावन या दोन्ही स्थानकांचे काम पूर्ण झाले आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, या महिन्यातच जादा लोकल आणि २ स्थानके एकाच वेळी प्रवाशांच्या सेवेत दाखल होतील. गव्हाण रेल्वे स्थानकावर शौचालये, प्लॅटफॉर्म, तिकीट काउंटर आणि पार्किंगची कामे पूर्ण झाली आहेत. सध्या किरकोळ काम सुरू आहे. टेलिग्राफ आणि गव्हाण स्थानके सिडकोने बांधली आहेत.

## महापालिका निवडणुकीआधी भाजपाकडून महिलांना साद

# मुंबईभर राबवणार 'बहीण लाडकी भाऊबीज देवाभाऊंची' कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी कौल दिल्यामुळे महायुतीला निर्विवाद बहुमत मिळालं. त्यामुळे आगामी मुंबई महापालिका निवडणुकीतही लाडक्या बहिणींचा कौल मिळावा, यासाठी भाजपाने महिलांना केंद्रबिंदू ठेवून रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. भाजपाच्या वतीने आजपासून मुंबईच्या सहा जिल्ह्यांत 'बहीण लाडकी भाऊबीज देवाभाऊंची' हा कार्यक्रम राबवला जाणार आहे. या कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांच्या गाण्यांचा कार्यक्रम होणार असून, त्यानंतर जिल्ह्यानिहाय 'मातृ शक्ती' मेळावे होणार आहेत. त्याबरोबरच 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने शुक्रवारी मुंबईतील सहा ठिकाणी 'वंदे मातरम'चे गायन होणार आहे, अशी माहिती भाजपाचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार अमित साटम यांनी दिली.

'लाडकी बहीण भाऊबीज देवाभाऊची' कार्यक्रम कसा असेल?

१) ६ नोव्हेंबर - उत्तर पश्चिम मुंबई जिल्हा (शेर ए पंजाब, पालिका मैदान, अंधेरी पूर्व, सायंकाळी ६.३० वाजता)

२) ७ नोव्हेंबर - दक्षिण मुंबई जिल्हा (लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, भायखळा, सायंकाळी ६.३० वाजता)

३) ८ नोव्हेंबर - उत्तर मुंबई जिल्हा (सप्त मैदान विहार, पोईसर जिमखान्याच्या समोर, बोरीवली. सायंकाळी ६.३० वाजता)

४) ९ नोव्हेंबर - उत्तर मध्य मुंबई जिल्हा (खेरवाडी मैदान, वांद्रे पूर्व, सायंकाळी ६.३० वाजता)

५) १० नोव्हेंबर - दक्षिण मध्य मुंबई जिल्हा (गांधी मैदान, चेंबूर, सायंकाळी ६.३० वाजता)

६) ११ नोव्हेंबर - उत्तर पूर्व जिल्हा (प्रमोद महाजन मैदान, टँक रोड, भांडूप, सायंकाळी ६.३० वाजता)

'वंदे मातरम' गीताचे सहा ठिकाणी कार्यक्रम : वंदे मातरम गीताच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त मुंबई भाजपातर्फे शुक्रवारी ७ नोव्हेंबर रोजी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी, शहिदांना वंदन आणि देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या वंदे मातरम गीताच्या १५० वर्षपूर्ती निमित्त सहा ठिकाणी कार्यक्रम ठरवून दिलेल्या वेळेत होतील, असे भाजपा मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी सांगितले.

पान १ वरून...

## लाडकी बहीण योजनेसाठी

लाभार्थ्यांपैकी २६ लाख लाभार्थ्यांचे पैसे थांबविण्यात आले होते. या लाभार्थ्यांची ओळख निश्चित झाल्यानंतर २० लाख लाभार्थ्यांचे पैसे सुरू करण्यात आले. मात्र अद्यापही सहा लाख लाभार्थ्यांची ओळख पटलेली नाही. त्यांना फोन करून तसेच त्यांच्या पत्त्यावर पोहोचून त्यांची पडताळणी करण्यात येत आहेत. मात्र अद्याप त्यांची ओळख न पटल्याने त्यांचे पैसे थांबविण्यात आले आहेत.

**सात हजार सरकारी कर्मचाऱ्यांकडून पैसे वसूल करणार**

विविध विभागांत सात हजार सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांनी लाडकी बहीणचा लाभ घेतल्याचे आढळले आहे. या महिला कर्मचाऱ्यांची यादी महिला व बालविकास विभागाकडून संबंधित विभागांकडे पाठविण्यात आली आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असून पैसेही वसूल करण्यात येणार आहेत. १२ हजार पुरुष लाभार्थी यात सापडले असून त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## पार्थ पवार जमीन खरेदी

त्यामुळे त्याबाबत योग्य माहिती घेऊनच बोलले पाहिजे. त्यादृष्टीने आज माहिती मिळाल्यानंतर शासनाची पुढची कारवाई काय आहे, त्याबाबत दिशा स्पष्ट करू'', अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली होती.

''उपमुख्यमंत्रीही (अजित पवार) अशा कुठल्याही प्रकाराला पाठिशी घालतील असे माझे मत नाही. यासंदर्भात आमच्या सरकारचे एकमत आहे. कुठेही अनियमितता झाली असेल तर त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. या मताचे आम्ही आहोत. अनियमितता झाली आहे का? हे पडताळून पाहिले पाहिजे. अनियमितता झाली असेल तर त्याच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल'', अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली.

## पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी

मुख्यमंत्र्यांनी दुपारी १२ वाजता कारवाईचे संकेत दिल्यानंतर आता २ तासांच्या आतच याप्रकरणात तहसलिदारांचे निलंबन करण्यात आलं आहे.

पुणे पार्थ पवार यांच्या कंपनीला देण्यात आलेल्या जमीन प्रकरणात अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात येणार आहे. तत्पूर्वी, पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांचे तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे, राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आता, याप्रकरणी अजित पवार आणि पार्थ पवार काय भूमिका मांडतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दुय्यम निबंधक रवींद्र तारूही निलंबित

पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी झालेल्या जमीन व्यवहारप्रकरणी तहसीलदारांनंतर दुय्यम निबंधक रवींद्र तारुही निलंबित झाले आहेत. याप्रकरणी, नोंदणीच बेकायदा असल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आलीय. पुण्यातील कोरेगाव पार्कमधील मोक्याची आणि मोलाच्या ४० एकर जागेचा बेकायदा व्यवहार करुन मूळ मालक आणि सरकारची फसवणूक करीत, पार्थ पवार आणि त्यांच्या कंपनीने ही जागा खरेदी केल्याचं मुद्रांक शुल्क विभागाच्या प्राथमिक चौकशीत पुढे आले आहे. त्यामुळे, हा संपूर्ण व्यवहार पूर्णपणे बेकायदा दिसत असल्याचे दाखवून पुण्यातील उपनिबंधक रवींद्र तारुंना निलंबित करण्यात आले आहे. मुद्रांक शुल्क विभागाकडून ही कारवाई करण्यात आलीय.

## थंडीची चाहूल!

चार अंशांनी घसरण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बंगालच्या उपसागरावर गुंगावणाऱ्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती धूसर होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात आता हवामान कोरडे होण्यास सुरुवात होणार आहे. पुढील २४ तासात महाराष्ट्रात किमान तापमान दोन ते तीन अंशांनी घटणार असून पाऊस उतरणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे. गेल्या काही आठवड्यांपासून मुंबई उपनगरासह कोकणपट्टी व दक्षिण मध्य महाराष्ट्राला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले. हवेत आर्द्रता व ओलावा कायम होता. दरम्यान, आज (६ नोव्हेंबर ) मुंबई ,ठाणे, रायगडसह मराठवाडा व दक्षिण मध्य महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता आहे. ७ नोव्हेंबरपासून हवामान शुष्क होत जाणार असून पुढील दोन दिवसात तापमानात घट होण्याची शक्यता आहे. मुंबईत अंशतः ढगाळ हवामान राहणारा असून दिवसा उखाडा जाणवेल. पहाटेच्या वेळी हवेत गारवा राहील.

रब्बी पेरण्यांना पोषक वातावरण

राज्यभरात पावसाचा जोर ओसरला असून आता हवामान शुष्क व कोरडे होण्यास सुरुवात होणार आहे. गेल्या काही आठवड्यांपासून होणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा मोठे नुकसान झाले. राज्यभरातील रब्बी पेरण्या खोळंबल्या. आता पेरण्यासाठी पोषक वातावरण तयार होण्यास सुरुवात होणार आहे.

## विद्यार्थी दिन

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी कोरोना आणि दिवाळी यामुळे शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### संधी मिळाली तर मुख्यमंत्री होणार; तेज प्रताप यादवांनी उघड केली इच्छा

पाटणा: आज बिहारमध्ये सकाळपासून मतदानाची रणधुमाळी सुरू आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत जनशक्ती जनता दलाचे (व्ऊ) राष्ट्रीय अध्यक्ष आणि महुआ मतदारसंघातील उमेदवार तेज प्रताप यादव यांनी मतदान केलं. यानंतर त्यांनी आपली महत्त्वाकांक्षा उघड केली. ''जर संधी मिळाली तर आपण मुख्यमंत्री होण्यास तयार आहोत. मात्र तो निर्णय जनतेचा आहे, असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. तेज प्रताप यादव यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत असल्याचं स्पष्ट करुन त्यांचे भाऊ तेजस्वी यादव यांच्या जखमेवर मिठ चोळलं आहे. तेज प्रताप यादव यांनी पाटणा इथल्या एका मतदान केंद्रावर मतदान केलं. मतदान केल्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना बिहारच्या नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं. यावेळी ते म्हणाले की, ''बिहारच्या नागरिकांनी मतदान केलं पाहिजे. प्रत्येक मत महत्त्वाचं आहे. पालकांच्या आशीर्वादाचं एक विशेष स्थान असून जनतेच्या आशीर्वादाचं महत्त्व आहे,'' असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. संधी मिळाली तर मुख्यमंत्री होणार : तेज प्रताप यादव यांनी संधी मिळाली तर आपण मुख्यमंत्री होणार अशी महत्वाकांक्षा उघड केल्यानं अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

याबाबत तेज प्रताप यादव म्हणाले की, ''माझ्या वडिलांनी पंतप्रधान होण्याची इच्छा व्यक्त केली होती. ते म्हणाले होते की, जर त्यांना पंतप्रधान होण्याची संधी मिळाली तर ते नक्कीच पंतप्रधान होतील. त्याचप्रमाणं, जर मला मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली, तर मी नक्कीच मुख्यमंत्री होईल.''

स्थलांतर थांबवणं आणि रोजगार देणं हे प्राधान्य : सामान्य माणसाच्या हिताचे रक्षण करणाऱ्या कोणत्याही सरकारसोबत उभं राहण्याची आपली तयारी असल्याचं तेज प्रताप यांनी यावेळी सांगितलं. याबाबत बोलताना ते म्हणाले की, ''...जो कोणी सरकार बनवेल, सामान्य माणसाला रोजगार देईल, स्थलांतर थांबवेल आणि बिहारमध्ये बदल घडवून आणेल, आम्ही त्याच्यासोबत उभे राहू. जनताच मालक आहे, जनताच सरकार ठरवते.''

### मेहनत, जिद्द अन् कुटुंबाच्या एकतेचा विजय! सख्ख्या बहीण-भावाचे सीए परीक्षेतील यश प्रेरणादायी

**पिंपरी-चिंचवड/प्रतिनिधी** : आकुर्डी दत्तवाडी येथील श्रीकृष्णनगरचा अभिमान ठरलेले मृणाल अनिल सावंत आणि मयूर अनिल सावंत या सख्ख्या बहीण-भावांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) या देशातील सर्वात कठीण परीक्षेत यश मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर या दोघांनी यशाचे शिखर गाठत संपूर्ण परिसराचा मान उंचावला आहे.

आई-वडिलांचा विश्वास : मृणाल आणि मयूर या दोघांनी शिक्षणाच्या प्रवासात एकमेकांसोबत अभ्यास करत परस्परांना प्रेरणा दिली. यशाच्या या वाटचालीत त्यांना घरच्यांचे अमूल्य पाठबळ मिळाले. पालकांनी केलेला त्याग आणि सतत दिलेलं प्रोत्साहन हाच त्यांच्या यशाचा पाया ठरला आहे. मृणाल सावंत म्हणाल्या, ''माझ्या यशाचं श्रेय माझ्या आई-वडिलांना आणि गुरुजनांना आहे. त्यांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे आणि मानसिक आधारामुळे हे यश मिळवणे शक्य झाले. अभ्यासात अडचणी आल्या तरी आई-वडिलांचा विश्वास माझ्यासाठी उर्जेचा स्रोत ठरला.''

प्रत्येक टप्प्यावर आत्मविश्वास वाढला : मृणाल यांनी पहिली ते दहावीपर्यंत विद्यानंद भवन स्कूलमध्ये आपलं शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर पुण्यातील बीएमसीसी कॉलेजमधून वाणिज्य शाखेत पदवी घेतली.

# एम्समधील नॅट केंद्राचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ






**नागपूर/प्रतिनिधी** : अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) नागपूर येथील न्युक्लिक ॲसिड टेस्टिंग (एनएटी) सेंटरचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. अशा प्रकारची सुविधा असणारी एम्स ही मध्य भारतातील पहिलीच सरकारी आरोग्य संस्था आहे. याचवेळी गॅमा ब्लड इर्रॅडिएटर या उपकरणाचेही उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. एम्सच्या रक्त संक्रमण विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

एनएटी ही रक्त, लाळ किंवा इतर नमुन्यातून रोगजंतू त्वरेने शोधणारी चाचणी आहे. या चाचणीद्वारे एचआयव्ही, हेपेटायटिस बी, हेपेटायटिस सी या सारख्या गंभीर आजारांचे निदान प्राथमिक अवस्थेतच होऊन संबंधित रुग्णावर तातडीने उपचार सुरू होऊ शकतात. अचूक निदान हे या चाचणीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. हे उपकरण रक्तपेढ्यांमध्ये लावल्यास गरजू रुग्णांना दूषित रक्त देण्याचा धोका जवळपास संपतो. गॅमा ब्लड इर्रॅडिएटरद्वारे अतिशय शुद्ध रक्त गरजू रुग्णांना मिळू शकते. रक्त संक्रमणातून होणारे आजार या उपकरणामुळे रोखले जातात.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दोन्ही उपकरणांची प्रशंसा करतानाच समाजातील गरजूंना त्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. प्रारंभी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी मुख्यमंत्र्यांचे यावेळी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. मृणाल पाठक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रशासक डॉ. विंकी रुघवाणी, एम्स मधील रक्त संक्रमण विभाग प्रमुख डॉ. सौम्या दास, डॉ. पराग फुलझेले, डॉ. रौनक दुबे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# भाजपची ऐतिहासिक मुसंडी; मतदाना आधीच तब्बल ७५ टक्के जागा बिनविरोध!

**मुंबई/प्रतिनिधी** : संपूर्ण देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वातावरण तापले असताना, केंद्र शासित प्रदेश असलेल्या दादरा व नगर हवेली आणि दमन व दीव मध्ये एक धक्कादायक राजकीय घडामोड समोर आली आहे. या प्रदेशातील स्थानिक निवडणुकीत भाजपने अभूतपूर्व यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, मतदानाआधीच तब्बल ७५ टक्के जागा बिनविरोध झाल्या असून, यावर काँग्रेसने गंभीर आरोप केले आहेत.

बुधवारी या केंद्र शासित प्रदेशात स्थानिक निवडणुकांसाठी मतदान पार पडले. मात्र, त्यापूर्वीच ग्रामपंचायत, नगरपंचायत आणि जिल्हा पंचायतीच्या प्रमुख पदांच्या निवडणुकीत भाजपचे एकूण १२२ पैकी ९१ उमेदवार बिनविरोध निवडून आले. निवडणुकीपूर्वीच ७५ टक्के जागा भाजपच्या पदरात पडल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे.

काँग्रेसचे अर्ज बाद, 'षडयंत्रा'चा आरोप

या मोठ्या राजकीय खेळीमागे 'गेम' झाल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. काँग्रेसचा दावा आहे की, त्यांच्या ८० टक्के उमेदवारांचे अर्ज निवडणुकीच्या रिंगणातून बाद करण्यात आले. याविरोधात काँग्रेसने थेट मुंबई हायकोर्टात धाव घेऊन बाद करण्यात आलेल्या अर्जांना आव्हान दिले आहे.

काँग्रेसचे प्रदेश प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी हे मोठे षडयंत्र असल्याचा आरोप केला. त्यांनी तक्रार केली की, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी फक्त सात दिवसांचा कालावधी दिला गेला. सुरुवातीचे दोन दिवस अर्ज उपलब्ध नव्हते आणि आवश्यक कागदपत्रांची यादीही वेळेवर मिळाली नाही. अर्ज छाननीचे ठिकाण अचानक बदलले गेले, आणि अर्ज भरण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या उमेदवारांना अर्ज बाद झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, भाजपच्या एकाही उमेदवाराचा अर्ज बाद झाला नाही, यावर त्यांनी जोर दिला.

दरम्यान, भाजपच्या विजयी उमेदवारांना २४ आणि २५ ऑक्टोबर रोजीच विजयी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

भाजपची ५ वर्षात मोठी झेप

बिनविरोध झालेल्या जागांची आकडेवारी भाजपच्या विजयाची कहाणी सांगते.

जिल्हा पंचायती: ४८ पैकी ३५ ठिकाणी भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले (मागील वेळी भाजपला फक्त ९ ठिकाणी विजय मिळाला होता).

सरपंच पदे: ४४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांपैकी तब्बल ३० सरपंच भाजपचे बिनविरोध निवडून आले.

दमन: जिल्हा पंचायतीत १६ पैकी १०, पालिकेत १५ पैकी १२ आणि १६ ग्राम पंचायतींपैकी १० मध्ये भाजपचे उमेदवार विजयी झाले.

दीव: आठ जिल्हा पंचायतींपैकी पाच ठिकाणी भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले.

दादरा व नगर हवेली: जिल्हा पंचायतीत २६ पैकी २०, १५ नगरपालिका वॉर्डपैकी १४ आणि २६ ग्रामपंचायतींपैकी १८ ठिकाणी भाजपला यश मिळाले.

### १७ लाखांचे बक्षीस असलेल्या महिला नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण!

**राजनांदगाव** : केंद्र सरकारनं देशातून नक्षलवाद संपवण्याचा विडा उचलला आहे. त्यासाठी विविध योजना केंद्र सरकारकडून राबवण्यात येत आहेत. दरम्यान छत्तीसगडमधील खैरागड पोलिसांना एक मोठं यश मिळालं आहे. १७ लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या एका नक्षलवादी महिलेनं पोलीस अधीक्षकांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. कमला सोडी असं या महिलेचे नाव असून ती ३० वर्षांची आहे. कमला सोडी ही कट्टर नक्षलवादी म्हणून नक्षलवादी संघटनेत सक्रिय होती.२०११ पासून नक्षलवादी संघटनेत सक्रिय : बक्षिसाची मोठी रक्कम जाहीर असलेल्या कमला सोडी हिने खैरागड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात महानिरीक्षक अभिषेक शांडिल्य आणि पोलिस अधीक्षक लक्ष्य शर्मा यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केलं. कमला सोडी ही २०११ पासून नक्षलवादी संघटनेत सक्रिय होती आणि मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील एमएमसी झोनमध्ये संघटनात्मक आणि हिंसक कारवायांमध्ये सहभागी होती. तसंच सुरक्षा दलांकडून नक्षलवाद्यांवर वाढत्या दबावामुळं आणि सरकारच्या धोरणांमुळं प्रभावित होऊन कमला सोडी हिनं आत्मसमर्पण केलं आहे.

## होता जीवा म्हणून वाचला शिवा... रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी'मध्ये
# सलमान खान साकारणार 'जिवा महाला'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलिवूडचा दबंग भाईजान सलमान खान म्हणजे, चाहत्यांच्या गळ्यातील ताईत. साठीला टेकलेल्या भाईजाननं काही दिवसांपूर्वीच शर्टलेस लूक शेअर करून सर्वांना धक्का दिलेला. भाईजानचा फिटनेस, त्याचे सिक्सपॅक ॲब्स पाहून सारेच अवाकब झालेले. आता सलमान खानचा 'बॅटल ऑफ गलवान' सिनेमा येणार आहे. याच सिनेमासाठी सलमाननं खूप मेहनत घेतल्याचं बोललं जात आहे. अशातच आता सलमान खाननं चाहत्यांना नवं सरप्राईज दिलं आहे. 'बॅटल ऑफ गलवान' सोबतच सलमान खान आणखी एका सिनेमात झळकणार आहे, याबाबत नुकतीच अपडेट समोर आली आहे. रितेश देशमुखचा आगामी सिनेमा 'राजा शिवाजी'मध्ये सलमान खान झळकणार आहे. तसेच, तो या सिनेमात छत्रपती शिवरायांच्या आयुष्यातल्या जीवाभावाच्या मावळ्याची भूमिका साकारणार आहे.

गेल्या काही वर्षांत बॉलिवूडच्या दिग्गजांच्या सिनेमांना पाहिजे तसं यश मिळालेलं नाही. सलमान खानचे तर सिनेमे बॉक्स ऑफिसवर जोरदार आपटले. रश्मिकासोबत केलेल्या 'सिकंदर'कडून अपेक्षा होती, पण या सिनेमाचीही जादू प्रेक्षकांवर फारशी चालली नाही. अशातच आता सलमान खानच्या 'बॅटल ऑफ गलवान'च्या जोरदार चर्चा रंगल्या आहेत. तसेच, या सिनेमासाठी सलमान खाननं घेतलेली मेहनत पाहता, प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. तसेच, आता तो रितेश देशमुखच्या छत्रपती शिवरायांवरच्या सिनेमात झळकणार असल्याची माहिती समोर आल्यामुळे भाईजानच्या फॅन्सची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.


रितेश देशमुख छत्रपती शिवरायांवर सिनेमा घेऊन येत असून त्याचं नाव 'राजा शिवाजी' असं असणार आहे. प्रेक्षक आतुरतेनं वाट पाहत असणाऱ्या या सिनेमामध्ये सलमान खान आणि त्यासोबतच संजय दत्त सुद्धा झळकणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर सिनेमा आधारित आहे. मीडिया रिपोर्टनुसार, सलमान आणि संजय दत्त दोघांचं शूटिंग शेड्युलही लॉक झालं आहे. संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत आहे. त्यामुळे त्याचं शेड्युल डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आलं आहे. 'राजा शिवाजी' सिनेमात सलमान कोणती भूमिका साकारणार याचीही उत्सुकता लागली आहे.

'राजा शिवाजी' सिनेमात सलमान खान कोणती भूमिका साकारणार?

रितेश देशमुखच्या आगामी सिनेमात तो स्वत: छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. तर, सलमान खान जिवा महाला या शूर मावळ्याची भूमिका साकारणार आहे. जिवाजी महाले हे छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक होते. दांडपट्टा चालवण्यात तरबेज असणाऱ्या जीवा महाला यांनीच प्रतापगडाच्या लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांना वाचवले होते. त्यामुळेच ''होता जीवा, म्हणून वाचला शिवा'' हे वाक्य म्हटलं गेलेलं. मीडिया रिपोर्टनुसार, संजय दत्त या सिनेमात अफझल खानाची भूमिका साकारणार आहे.

दरम्यान, सलमान खाननं यापूर्वीही रितेश देशमुखच्या सिनेमांमध्ये कॅमिओ केलेला. रितेश देशमुखचा गाजलेला सिनेमा 'लय भारी'मध्येही सलमान खान दिसलेला. त्यानंतर 'वेड' सिनेमातही तो रितेशसोबत एका गाण्यात दिसलेला.

## शब्दकोडे क्र. 03



आडवे शब्द

३. राख ४. किंचित देखील ७. यादवीत बुडालेली नगर १०. गीतेतील ज्ञान मराठीत आणणारे १२. वर्ण १४. रोटीचे एक धान्य १५. दह्याचे पाचक पेय १६. आयुष्यभर १९. दिवाळीतील 'लक्ष्मी' २१. दिसायला एकसारखे २३. स्पष्ट केलेले २६. वार्धक्य २८. आयुष्य २९. पाण्यातील सजीव ३१. वंश ३२. मीठ (हिंदी) ३५. शाश्वत, कायमचे ३६. सलगी ३७. लाकूड कापण्याचे साधन ३९. वादावादी ४०. आजोबा म्हणणारी ४१. पुष्कळ ४३. हेळसांड, दुर्लक्ष ४७. ठाऊक, ज्ञात ५०. मनोरंजन ५२. सामूहिक व्यायाम ५३. गुणांची कदर नसलेला ५५. मियांचा दंडावरचा दागिना ५६. संकट (ला.) ५७. दारू, मद्य ५८. न बोलण्याचे व्रत ६०. नाकारलेले ६२. पार्वती ६३. चार वेदांपैकी एक ६५. रवींद्रनाथांचे काव्य ६७. महिना ६८. कर्ज ६९. भेटवस्तू ७०. ठीक, बेताचा ७१. वर्षाव, सरबत्ती ७२. सरशी ७३. ताठा ७४. सुळका ७६. लाचार, उपकाराच्या ओझ्याला दबलेला ७७. भारतीय बाजारपेठेवर आक्रमण केलेला देश ७९. शत्रू ८०. चोप ८१. भंगूर ८२. उलट ८३. प्रशस्त, पाल्हाळिक

उभे शब्द

१. खोटा, लटका २. 'श्यामाची आई'चे लेखक ३. रामाचा एक भाऊ ५. बेडूक ६. क्रोध ८. तरुणी ९. चुलता १०. राग आणणारे ११. जरब, भीती १३. दरवाजा, दार १७. प्रसाद, यज्ञातील आहुती १८. आठवण (हिंदी) २०. अमृत २२. चिंचवड या नदीकाठी आहे २४. त्वचेवर लावण्याचे औषध २५. केस २७. बुधकौशिक रचित स्तोत्र २९. जयघोष ३०. रौप्य ३१. हुलगे ३३. मिठी ३४. खुमारी, स्वाद ३८. फरक ४०. अनुयायांसाठी आदर्श ४२. ताकद ४४. दमदाटी, दम ४५. सेपे ४६. तीव्र गरज ४७. असफल ४८. लकडा ४९. खुमखुमी ५१. पाठवणी ५४. थर्मामीटरमधील धातू ५६. अवस्था ५९. बुजणारा, संकोची ६०. असंतोष ६१. जंत ६२. कमी महत्त्वाचे ६३. सर्प ६४. जास्त किंमतीचे ६६. लाल ६८. सत्य ६९. उरलेले ७२. खोगीर ७४. अन्नाचा घास ७५. विष ७७. भेग ७८. हे तर दुधातच लपलेले असते ८०. महाशिवरात्रीचा महिना

### शब्दकोडे क्र. 02 चे उत्तर

आडवे उत्तर

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

उभे उत्तर

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत

## विविध वृत्त...

### नगरसेवक झाले आमदार, आता मुंबई महापालिका निवडणुकीत उत्तराधिकारी कोण?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणूक भाजपा-शिवसेना महायुतीसाठी प्रतिष्ठेची, तर शिवसेना (उबाठा) पक्षासाठी अस्तित्वाची लढाई ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीतील यशानं भाजपाची मुंबईत कमळ फुलवण्याची महत्त्वाकांक्षा उंचावली आहे, तर शिवसेना (उबाठा) पक्षासाठी ही निवडणूक भवितव्याशी निगडीत आहे. त्यामुळं सर्वच पक्ष उमेदवार निवडीत जोखीम टाळण्यावर भर देत आहेत. २०१७ च्या पालिका निवडणुकीत विजयी झालेल्या नगरसेवकांना प्राधान्य देण्याची रणनीती आखली जात आहे. मात्र जे नगरसेवक आता विधानसभेत आमदार म्हणून पोहोचले, त्यांच्या रिक्त जागांवर इच्छुकांची रांग लागली आहे. मुंबईतून २०१९ मध्ये चार, तर २०२४ मध्ये चार असे एकूण आठ नगरसेवक आमदार झाले. या आमदारांचा उत्तराधिकारी कोण? याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

आमदारांच्या जुन्या प्रभागांमध्ये नेमके चित्र काय?

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईतून १८ हून अधिक माजी नगरसेवकांनी नशीब आजमावलं, पण यश फक्त चौघांना मिळाले. मनोज जामसुतकर (शिवसेना (उबाठा), भायखळा), अनंत उर्फ बाळा नर (शिवसेना (उबाठा), जोगेश्वरी पूर्व), महेश सावंत (शिवसेना (उबाठा), माहीम) आणि मुरजी पटेल (शिवसेना, अंधेरी पूर्व) हे चौघे विधानसभेत पोहोचले. २०१९ मध्ये आमदार झालेल्या यामिनी जाधव आणि रमेश कोरगावकर यांचा २०२४ मध्ये पराभव झाला, तर दिलीप लांडे आणि रईस शेख आमदारकी कायम ठेवू शकले.

भायखळ्यात माथाडी कामगार आणि मुस्लिमबहुल भागात मजबूत पकड असलेले मनोज जामसुतकर आपला २०२१ क्रमांकाचा वार्ड आमदारकीनंतरही सोडण्यास तयार नाहीत. त्यांची पत्नी किंवा कुटुंबातील सदस्याला तिकीट जवळपास निश्चित मानले जात आहे. मात्र पराभवाचा वचपा काढण्यासाठी यामिनी जाधव स्वत: किंवा त्यांचा विश्वासू कार्यकर्ता मैदानात उतरण्याची दाट शक्यता आहे.

### नुकसानभरपाईसाठी सहा रुपयांची मदत, शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सरकारी मदत शेतकऱ्यांना भेटायला सुरुवात झालीय, मात्र यात त्यांच्या नुकसानीची थट्टा उडवली गेली का? असा प्रश्न उपस्थितीत केला जातोय. पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील शेतकऱ्याला दोन एकर शेतात झालेल्या नुकसानीसाठी चक्क सहा रुपये इतकी भरपाई मिळाली आहे. दिगंबर तांगडे असं शेतकऱ्याचे नाव असून, त्यांनी पीक विमा काढण्यासाठी ३५० रुपये भरून विमा काढला होता, नुकसान झाल्यास ६८ हजार रुपये मिळतील, असं वाटत असताना मिळालेली रक्कम म्हणजे आमची थट्टा आहे, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दिवाळीपूर्वी मदत मिळणार असं आश्वासन सरकारने दिले होते, त्यात आता मदत येण्यास सुरुवात झाली. परंतु याला मदत म्हणतात का? असा संतप्त प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केलाय.

पैठण तालुक्यात शेतकऱ्याला सहा रुपये आले : यावर्षी आतापर्यंतची सर्वात मोठी अतिवृष्टी मराठवाड्यात पाहायला मिळाली. पीक नष्ट झाली, जमिनी खरडून निघाल्या. सरकारतर्फे नुकसानभरपाईसाठी मदत देण्याची घोषणा झाली, त्यात काही शेतकऱ्यांना दोन दिवसांपूर्वी बँक खात्यात पैसे जमा झाल्याचा संदेश मिळाला. पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील दिगंबर तांगडे या शेतकऱ्याला देखील बँकेचा संदेश प्राप्त झाला, त्यांनी तो वाचल्यावर त्यांचा संताप झाला. कारण नुकसानभरपाई म्हणून अवघे सहा रुपये खात्यात जमा झाले होते. दिगंबर यांच्याकडे दोन एकर शेती आहे, ज्यामध्ये कापूस आणि कांदा अशी दोन पिके ते घेतात. आपत्कालीन परिस्थितीमध्ये शेतीत होणारे नुकसान भरून निघावे, यासाठी त्यांनी कांदा पिकासाठी ३५० रुपये भरून पीक विमा काढला. एक एकर कांद्याचे नुकसान झाल्यास ६८ हजार रुपये मिळतील, अशी माहिती विमा कंपनीने दिली. यंदाच्या अतिवृष्टीत दोन्ही पिके उद्ध्वस्त झाली. विम्याची रक्कम मिळेल असं वाटत असताना सहा रुपये कसे आले, असा प्रश्न दिगंबर तांगडे यांनी सरकारला विचारला.

### घरावर ईडीची छापेमारी पडल्याची थाप: सोशल माध्यमावर भेटलेल्या भामट्यानं भावी वधूला घातला लाखो रूपयांचा गंडा

**ठाणे/प्रतिनिधी :** भावी वधूशी सोशल माध्यमांवर ओळख करुन मैत्री केली, त्यानंतर दोघात प्रेमच सूत जुळलं. मात्र आरोपीनं लग्नाच्या आणाभाका घेतल्या, त्यातच माझ्या घरावर ईडीची धाड पडली असून यातून सोडवण्यासाठी भावी वधूला ९२ लाख ७५ हजार रूपयांचा गंडा घातल्याची घटना समोर आली आहे. ही घटना डोंबिवली पश्चिम भागात उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित भावी वधूनं विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शैलेश प्रकाश रामगुडे (३०) असं गुन्हा दाखल झालेल्या भामट्याचं नाव आहे. तो ठाणे पश्चिमेतील हिरानंदानी इस्टेटमधील सॉलिटर इमारतीत राहतो.

# भुमराळा गावात बिबट्याचा धुमाकूळ!

## शेतकरी संतोष काळे यांच्या गायीवर हल्ला; ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट

**दैनिक आपला विदर्भ**

**भुमराळा/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील भुमराळा गावात काल रात्री घडलेल्या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. शेतकरी संतोष शिवाजी काळे यांच्या गायीवर बिबट्याने भीषण हल्ला करून तिला ठार केल्याने ग्रामस्थ अक्षरशः हादरले आहेत.

घटना ५ नोव्हेंबरच्या मध्यरात्री घडली. संतोष काळे यांच्या शेतातील गट क्रमांक २०९ मध्ये गाय बांधलेली होती. रात्रीच्या अंधारात, गाव शांत झोपलेलं असताना, बिबट्याने अचानक शेतात प्रवेश करून गायीवर झडप घातली. तीव्र संघर्षानंतर गायीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसून आला.





सकाळी काळे आपल्या गोठ्याकडे गेले असता, त्यांनी ही थरारक दृश्य पाहून थक्क झाले. काही क्षण ते स्थिर उभे राहिले, आणि नंतर गावात हळहळ व्यक्त करत धाव घेतली. त्यांनी तत्काळ गावातील पत्रकार देवानंद सानप यांना घटनेची माहिती दिली. सानप यांनी वनविभागाशी संपर्क साधत पथकाला घटनास्थळी बोलावले. वनपाल वसंता फुके व वनरक्षक आरु यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल सादर केला आहे.


दरम्यान, सध्या परिसरात कापणी आणि वेचणीचे काम जोमात सुरू असल्याने, शेतकरी वर्ग रात्रभर शेतात असतो. अशा वेळी बिबट्याची हालचाल हे ग्रामस्थांच्या जीवाला घोर संकट ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

गावातील शेतकऱ्यांनी वनविभागाकडे बिबट्याला तात्काळ जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावावेत, अशी मागणी केली आहे. तसेच, मृत गायीबाबत योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही शेतकरी वर्गाकडून करण्यात आली आहे.

"आमच्यासाठी गाय ही केवळ जनावर नाही, ती कुटुंबाचा सदस्य आहे. तिचा असा अंत पाहून मन पिळवटून निघालं," असं भावनिक वक्तव्य काळे यांनी केलं.

गावातील काही भागात रात्री बिबट्याचे हालचालीचे ठसेही आढळले असून, त्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. ग्रामस्थांचा एकच सूर वनविभागाने आता तरी जागं व्हावं, बिबट्याला पकडण्यासाठी तातडीने पिंजरा लावावा. आमचं आणि आमच्या जनावरांचं रक्षण करा!"

## नगरपरिषद निवडणूक : जिल्हाधिकाऱ्यांची राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्याअनुषंगाने जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यासाठी आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी त्यांच्या कार्यालयात बैठक घेतली.

या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुहासिनी गोणेवार, मुख्य वित्त व लेखाधिकारी प्रकाश राठोड, जिल्हा सह आयुक्त पेंटे व भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, रिपाई, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.), शिवसेना (उ.बा.ठा.), महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यावेळी निवडणूक कार्यक्रमाची माहिती देवून निवडणुक प्रक्रियेची ही संपूर्ण माहिती संभाव्य उमेदवार व नागरिकांपर्यंत पोहचवावी. मतदार याद्या, निवडणूक आयोगांचे आदेश, सूचनाबाबतची माहितीपुस्तिका जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर आणि राज्य निवडणुक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच नियमांचे पालन करुन निवडणुक प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहन त्यांनी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना केले.

### अजितदादांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, एकनाथ खडसेंची मागणी

**जळगाव/प्रतिनिधी :** पुण्यातील कोरेगाव पार्कमधील ४० एकरावरील जमिनीच्या व्यवहारावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे (शरद पवार) ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी, या कंपनीने अंदाजे १,८०० कोटी रुपयांच्या बाजारभावाची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना खरेदी केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या व्यवहारावर फक्त ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी आकारण्यात आल्याचेही उघड झाले आहे.

### खामगावमध्ये लोकशाहीचा उत्सव! नगर परिषद निवडणुका २ डिसेंबरला, मतमोजणी ३ डिसेंबरला




**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात लोकशाहीचा उत्सव रंगणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने अखेर खामगाव नगर परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला आता सुरुवात होणार आहे.

घोषित कार्यक्रमानुसार, २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान पार पडणार असून ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह एकूण ३५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. म्हणजेच ३६ सदस्यांची नवीन नगर परिषद स्थापन होणार आहे.

२०१७ च्या निवडणुकीत खामगाव नगर परिषद क्षेत्रात १६ प्रभागांतून ३२ नगरसेवक निवडून आले होते. मात्र यंदा नव्या प्रभाग रचनेनुसार एक नवीन प्रभाग वाढवण्यात आला असून आता एकूण १७ प्रभागांमधून ३५ नगरसेवकांची निवड होईल.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, खामगाव नगर परिषद क्षेत्रात ३७ हजार २६६ पुरुष मतदार आणि ३६ हजार ३३८ महिला मतदार अशी एकूण ७३ हजार ६०८ मतदारसंख्या आहे.

राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. निवडणुकीच्या तारखांची घोषणा होताच शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून, सर्वच राजकीय पक्षांनी प्रचाराची तयारी सुरू केली आहे.

## बीएमसी निवडणुकीसाठी काँग्रेसमध्ये इच्छुक उमेदवारांची झुंबड, ११५० पेक्षा जास्त अर्ज दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम अजून जाहीर झालेला नसला, तरी काँग्रेसमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांची अक्षरश: झुंबड उडाली आहे. काँग्रेसकडून अर्ज मागविल्यानंतर आतापर्यंत तब्बल ११५० पेक्षा जास्त अर्ज दाखल झाले आहेत. मुंबईतील सहाही विभागांमधून उमेदवारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आरक्षण सोडत लवकरच जाहीर होणार असल्याने अर्ज भरण्याची मुदत वाढविण्याचा विचार सुरू आहे, अशी माहिती मुंबई काँग्रेसचे प्रवक्ते आणि माध्यम समन्वयक सुरेशचंद्र राजहंस यांनी दिली.

२२७ वॉर्डासाठी इन्चार्ज नियुक्त : मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीची तयारी जोमात सुरू आहे. २२७ वॉर्डासाठी इन्चार्ज नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून प्रत्येक वॉर्डात बैठकांचे सत्र सुरू आहे. कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीबाबत मोठी उत्सुकता असून, ही निवडणूक काँग्रेसने स्वबळावर लढवावी, अशी बहुसंख्य कार्यकर्त्यांची मागणी आहे. मात्र, आघाडी करायची की स्वतंत्रपणे लढायचं, याबाबतचा अंतिम निर्णय अजून झालेला नाही. या संदर्भात दिल्लीतील पक्षश्रेष्ठी निर्णय घेणार असल्याचे राजहंस यांनी सांगितले. तरीसुद्धा, वर्षा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते जोरदार तयारीला लागले आहेत.

घराघरात पोहोचण्याची मोहीम – मुंबई महानगरपालिकेत पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी काँग्रेसकडून घराघरात पोहोचण्याची मोहीम सुरू झाली आहे.

# श्री संत गजानन महाराज संस्थान, डोणगाव यांच्या वतीने भव्य मोफत आरोग्य सेवा शिबिर

**दैनिक आपला विदर्भ**

**भुमराळा/प्रतिनिधी :** श्री संत गजानन महाराज संस्थान, डोणगाव यांच्या वार्षिक महोत्सवानिमित्त भव्य मोफत आरोग्य सेवा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर डॉक्टर असोसिएशन, केमिस्ट असोसिएशन व लॅब असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.

अलीकडील अतिवृष्टीमुळे परिसरात उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करून, या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून गरजू, गोरगरीब शेतकरी तसेच सर्व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.




हे शिबिर दिनांक ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दररोज सकाळी ११ ते सायं. ५ या वेळेत पार पडणार आहे. शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व सल्ला दिला जाणार आहे.

दररोज वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर जनरल मेडिसिन, आयुर्वेद, दंतचिकित्सा, स्त्रीरोग, बालरोग, नेत्रतपासणी, हाडरोग, त्वचारोग, हृदयविकार, कान-नाक-घसा तसेच इतर विशेष विभागातील तज्ज्ञ आपली सेवा देणार आहेत.

या शिबिरात सहभागी होणाऱ्या काही प्रमुख डॉक्टरांमध्ये डॉ. मंगेश बाजड, डॉ. गजानन उल्लामाले, डॉ. संजय धाडकर, डॉ.सावळे, डॉ. शिवाजी बाजड. डॉ. सौ. सारिका बाजड सह अनेक डॉक्टरांचा समावेश आहे.

संस्थानच्या वतीने सांगण्यात आले की, "अतिवृष्टीमुळे त्रस्त झालेल्या शेतकरी बंधूंना आणि सर्व नागरिकांना आरोग्यदायी मदत मिळावी, हा या शिबिराचा प्रमुख उद्देश आहे."

स्थळ: श्री गजानन महाराज संस्थान, डोणगाव

कालावधी: ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२५

वेळ: सकाळी ११ ते सायं. ५

प्रवेश: पूर्णपणे मोफत

आपल्या आरोग्यासाठी आपल्या सेवेसाठी! सर्व नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.